महसूल विभाग संवर्ग बदलीबाबत- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक- गट-अ (कनिष्ठ)

संचा... कोषागारे
महारा... -20
29 FEB 2024
प्राप्त झाले सही......

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश क्र.संलेको २०२३/प्र.क्र.२३७/कोषा प्रशा-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-२६/०२/२०२४.

वाचा :- सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना दि.१४.०७.२०२१.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक- गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील श्रीम.वनिता कौतीक बावीसकर, सहायक संचालक यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, संदर्भाधिन शासन अधिसूचना दि.१४/०७/२०२१ मधील तरतुदीनुसार त्यांचा सध्याचा कार्यरत स्तंभ क्र.३ येथे नमूद केलेला महसूली विभाग बदलून त्यांना स्तंभ क्र.४ येथे नमूद केलेल्या महसूली विभागात, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ च्या कलम ४ (४) व (५) मधील तरतूदीनुसार खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.५ मध्ये नमूद पदावर विनंती बदली करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव व सध्याचे पद व कार्यालय | सध्याचा कार्यरत महसूली विभाग | बदलून दिलेला महसूली विभाग | बदलीने पदस्थापना द्यावयाचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम. वनिता कौतिक बावीसकर, सहायक संचालक, महानगर पालिका लेखा परीक्षण उप विभाग-३, छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | पुणे | सहायक संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे. |

२. वरीलप्रमाणे बदली झालेले लेखा अधिकारी यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी बदली अधिकाऱ्याची प्रतिक्षा न करता स्थानिक व्यवस्था करुन संबंधित अधिकाऱ्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

३. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी कार्यमुक्त झाल्यावर बदलीच्या पदावर तात्काळ हजर व्हावे. बदलीच्या पदावर हजर होताच संचालक, संचालनाय लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(ता. र. पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर*
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई*
मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख*
संबंधित अधिकाऱ्यांच्या बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख*
संबंधित अधिकारी*
निवडनस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
(*संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचेमार्फत)

294/2024/381